अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
। गुरुवार, दि. २० जून २०२४ । पान : ३

## घटनाक्रमावरुन बळावला संशय

प्रियांश याचा शुक्रवारी दुपारी साधारण सव्वा वाजण्याच्या सुमारास मेंदूमध्ये रक्तस्त्राव होऊन मृत्यू झाला होता. दुपारी अडीचनंतर मोदी स्मशानभूमीत त्याचे दफन करण्यात आले होते. दफन केल्याच्या दुसऱ्या दिवशी शनिवार होता. हा दिवस अघोरी कृत्यांच्या विधीसाठी खास मानला जातो. या दिवशी जादूटोणावाले विधी करतात. हाच शनिवारचा दिवस गाठून प्रियांश याचा मृतदेह उकरुन नेला असेल का? कारण प्रियांशच्या घरच्यांसह नातेवाईकांनी रविवारी सकाळी पाहिले तेव्हा ज्या खड्ड्यात प्रियांश याचे दफन केले होते. तो खड्डा उरकलेला होता. त्यामध्ये प्रियांश याचा मृतदेह नव्हता. म्हणजे प्रियांश याचा मृतदेह शुक्रवारी दुपारी पुरल्यानंतर रविवारी सकाळपर्यंतच्या आत नेला असावा का? अशी शंका उपस्थित केली जात आहे.



प्रियांश वाघमारे

# शनिवारच्या विधीसाठी मृतदेह नेण्याच्या अंदाजवरुन तर्क-वितर्कांना उधाण
# अघोरी विद्येसाठी जावळ असलेल्या प्रियांशचं डोकं वापरल्याचा संशय

▶▶ मोदी स्मशानभूमीत वावर असणारे सहाजण चौकशीसाठी पोलिसांच्या ताब्यात

▶▶ मात्र मृतदेह गायब प्रकरणात अद्याप कोणताही सुगावा पोलिसांना लागेना

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**अघोरी विद्येसाठी जावळ असलेल्या मुलाची मुंढी जादू टोणावाले लोक वापरतात. हा विधी ते शनिवार या खास ठराविक दिवशीच करतात, कारण या दिवशीच केलेला विधी सफल होतो, अशी जादूटोणा करणाऱ्यांची धारणा असते, जावळ असलेल्या अवघ्या दहा महिन्याच्या प्रियांशचा अघोरी विद्येसाठी मृतदेह नेला असेल का? शुक्रवारी दफन केलेला मृतदेह खास शनिवारीच्या दिवशी करणाऱ्या विधीसाठी नेला असेल अशा तर्कवितर्कांना सोलापुरात उधाण आले आहे. डोक्यावर जावळ असलेल्या प्रियांश याच्या मुंढीचा उपयोग अघोरी विद्येसाठी तरी केला नसेल ना? याबद्दल शंका-कुशंका व्यक्त करण्याबरोबरच तसा दाट संशयदेखील व्यक्त केला जात आहे.**

तथापि, दुसऱ्या बाजूला जोडभावी पोलीस ठाण्याच्या संबंधित चौकशी अधिकाऱ्यांकडून प्रियांश याचा मृतदेह गायब होण्याच्या घटनेच्या अनुषंगाने, सगळ्या शक्यता तपासून पाहिल्या जात आहेत. सोलापूर महानगरपालिकेच्या ज्या मोदी स्मशानभूमी ज्यांचा ज्यांचा वापर असतो अशापैकी सहा जणांना पोलीसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या संबंधितांच्या चौकशीतून अद्याप तरी घटनेचे रहस्य उलगण्याच्या अनुषंगाने, कोणताही ठोस धागादोरा अद्याप मिळाला नसल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात आले.

### मृतदेह कर्नाटकात गेला का? याचाही बोलबाला

कर्नाटक राज्यात जादूटोणावाले आहेत. कोवळ्या मुलांचे मृतदेह घेऊन त्याद्वारे अघोरी विद्या करण्याचे प्रकार या राज्यातील काही मांत्रिकांकडून होत असतात. तसाच प्रकार प्रियांश वाघमारे या मृत बालकाच्याबाबतीत झाला असावा? त्याचा मृतदेह उकरुन कर्नाटकात नेला असावा का? असाही बोलबाला खुद्द मोदी स्मशानभूमी परिसरात सोलापुरात अनेक ठिकाणी आहे.

### डुक्कर किंवा कुत्र्यांनी मृतदेह गायब करण्याला दूजोरा कसा?

मोदी स्मशानभूमीमधील दफन परिसरात प्रियांश याचं दफन करत असताना सुरवातीला छोटा खड्डा घेतला होता. त्या खड्ड्यात प्रियांश याचा मृतदेह सुरक्षीत बसेना तेव्हा त्याचे आजोबा आणि वडिल यांनी घेतलेला खड्डाच खोल आणि उंच केला केला. साधारण तीन फुट खोलीचा खड्डा करुन त्यात प्रियांश याचे दफन केले. प्रियांश याचे प्रेत पुरल्यानंतर त्या खड्ड्यावर फरशी, दगड आणि काटे टाकले होते. डुक्कर किंवा कुत्री यांना हा खोल खड्डा उकरताच येणार नाही, इतकी दक्षता खड्ड्याच्या बाबतीत घेण्यात आली होती, त्यामुळे डुक्कर किंवा कुत्र्यांनी हा मृतदेह उकरलेला नाही. तो माणसांनी उकरून नेला असा आमचा ठोस दावा आहे असे प्रियांश याचे आजोबा व वडिलांनी सांगितले.

### खड्ड्याच्या ठिकाणी रक्त किंवा खाणाखुणा नाहीत

प्रियांश याचा मृतदेह खड्ड्यातून डुक्कर किंवा कुत्र्यांनी जर वरती काढला असता शिवाय तो फरपटत ओढत नेला असता तर प्रियांश याच्या शरिरामधील रक्त खड्ड्याच्या परिसरात पडले असते. शिवाय मृतदेह ओढून नेण्याच्या खाणाखुणा खड्ड्याच्या परिसरात उमटल्या असत्या पण तसा काहीच प्रकार घटनास्थळी दिसत नाही.

### लपटलेले कापड एकदम सुस्थितीत कसे?

मृत प्रियांश याच्या अंगाला दवाखान्यात एक कपडा गुंडाळलेला होता. जेव्हा प्रियांश याचं प्रेत त्याच्या घरी आणलं होतं. त्यावेळी दुसरा एक कपडा त्याच्या अंगाला गुंडाळण्यात आला. दरम्यान प्रियांश याच्या अंगाला त्याच्या घरी वाघमारे कुंटुंबियांनी जो कपडा लपेटला होता, तो कपडा जशास तसा उरकलेल्या खड्ड्याच्या शेजारी पडलेला होता. कुत्री किंवा डुक्कर यांनी जर मृतदेह उकरला असता तरी तो अंगावरचा कपडा फाटला असता. पण तसेच अजिबात कपड्याच्याबाबतीत झालेले दिसत नाही. यावरुन मृतदेह कोणत्या प्राण्याने उकल्याचे वाटत नाही.

### आणखी काहीजणांना घेतलं जाणार ताब्यात

घटनेच्या तपासाच्या पार्श्वभूमीवर, पोलिसांनी मोदी स्मशानभूमीत वावर असणाऱ्यांपैकी खड्डे खोदणारे, सरपण पुरवणारे, चाळण्यासाठी माती नेणारे आदी सहाजणांना ताब्यात घेतले. मात्र त्यानंतर आता आणखी काहीजणांना पोलीस चौकशीसाठी ताब्यात घेणार असल्याची माहिती पोलिस सुत्रांकडून मिळाली.

# रघुनाथ आईला कवटाळला...
# बाबा....बाबा... म्हणत चिमुरडे काकाला बिलगले






● परिवार दिसला तेव्हा आई अन् भावाचं काळीज सुपाएवढं झालं

● स्मशानप्रमाणं शांततेच्या गर्तेत गेलेलं घर आनंदून गेलं

● क्षीरसागर परिवारातील सदस्यांच्या एका डोळ्यात आसू अन् दुसऱ्या डोळ्यात आसू

● मिसिंग दाखल झाल्यानंतर अवघ्या २४ तासांत एमआयडीसी पोलिसांनी लावला छडा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**आज बुधवारचा दिवस उजडलेला. अद्याप सूर्योदय व्हायचा होता. रघू आपल्या परिवारसह जाण्यानं चिंतेत असलेल्या भाऊ निरंजन आणि आई पार्वती यांच्या डोळ्याला डोळा लागलेला नव्हता. रघूच्या बाबततीत निरोपाचा फोन येईल म्हणून निरंजन आणि आई या दोघांनी अक्षरक्ष: रात्र जागून काढलेली. डोळ्यावर तंद्री असलेल्या अवस्थेत सकाळी पावणेसातच्या दरम्यान ते दोघे घरातच पडून राहिलेले. याच दरम्यान रघूनाथ घरी आलेला. त्याला दिसताच भाऊ निरंजन आणि आई पार्वती खाडकन जागे झाले. रघू घरी आल्याचं आपण स्वप्न तरी पाहत नाही ना? असं त्यांना क्षणभर वाटलं. दुसऱ्या क्षणी आई रघूला कवटाळली. 'माझं लेकरु आलं गं बाई, बाळा काही झालं नाही ना कोणाला?' असे शब्द तिच्या तोंडून बाहेर पडले. त्याच क्षणी भीमाशंकर अन् खुशी हे दोघा चिमुरडे बाबा...बाबा...म्हणत काका निरंजन यांना बिलगले. गेल्या चार दिवसांपासून सुतककळा जाणवणारं क्षीरसागर यांचं घर एकदमच आनंदून गेलं. घरातील सर्वांच्या आनंदाला अक्षरश:पारवार उरला नाही.**

अक्कलकोटला दुकान उघडायला लवकर जायचं आहे, असं सांगत सोलापूरच्या गणेश नगर भागातील मेहुण्याच्या घरातून शनिवारी (ता.१४) सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास बाहेर पडलेला रघूनाथ क्षीरसागर हा तरुण आपली पत्नी अंकिता, मुलगा भीमाशंकर आणि मुलगी खुशी यांच्यासह गायब झाला होता. त्याच दिवशी सकाळी ९ वाजून ३९ मिनीटांनी रघूनाथ याचा फोन स्वीचऑफ झाला होता. रघूनाथ आपल्या कुंटुंबियासह बेपत्ता झाल्याबद्दलची मिसिंगची तक्रारी दाखल झाली होती.

दरम्यान एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत तातडीनं सुत्रं हलविली. रघूनाथ याच्या मोबाईलचं लोकेशन तपासले असता ते पुण्यातले आढळून आले.

मोबाईल लोकेशनवरुन पोलीसांनी रघूनाथसह त्याच्या कुंटुंबियांना शोधून काढलं. पोलिसांनी त्यांना पुण्यातून बुधवारी अक्कलकोटला सकाळी आणलं.

### काही ठळक नोंदी

▶▶ पुण्याला फिरायला गेला होतो, असा सांगण्याचा कांगवा रघूनाथ यांनं केला.

▶▶ रघूनाथला जाण्याबद्दल विचारल्यास तो आणखी रागाला जाईल म्हणून आई अन् भावाने त्याला काहीच नाही विचारले

▶▶ कुंटुंबासमवेत रघूनाथ न सांगता गायब झाल्यानं घरातील सर्वजण होते अत्यंत चिंतेत

### पाहुण्याराावळ्यांसह मित्रमंडळींनी घर भरलं

रघुनाथ आपल्या कुंटुंबासह अक्कलकोटमध्ये घरी सुखरुप आल्याची वार्ता फोनद्वारे पाहुण्याराावण्यांसह मित्रमंडळी, भावकी यांच्यापर्यंत पोचली. त्यानंतर रघूनाथसह त्याच्या परिवाराला भेटायला सगळी मंडळी जमली. घर पाहुण्याराावण्यांसह मित्रमंडळींनी भरलं.

### रघुनाथ हा रागातून गेला होता निघून

रघुनाथ हा रागातून शनिवारी सकाळी बेपत्ता झाला होता. त्याच्या रागाचे कारण हे घरगुती होते. घरात कुरबुर झाल्याने त्याने आपल्या कुंटुंबियासह गायब होण्याचा पवित्रा घेतला, असे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या पोलीसांनी सांगितले.

# पोटाची आग भागविण्यासाठी 'त्या' कामाला जायच्या
# पण नियतीनं डाव साधला अन् काळानं झडप घातली

✔ सांगोला/प्रतिनिधी

**पोटाला लागतेच किती दोनचार भाकरी अन् वाटीभर आमटी. पण हेच मिळवण्यासाठी प्रत्येकाची धडपड ही ज्याच्या त्याच्या परीने सुरु असते. पोटाची आग भागविण्यासाठी अर्थात भाकरीचा चंद्र शोधण्यासाठी सर्वसामन्य गोरगरीबांचा संघर्ष सुरु असतो. असाच संघर्ष सांगोला तालुक्यातील 'त्या' अभागी महिलांचा होता. या संबंधित सहाजणींच्या आयुष्यात नियतीनं काय वाढून ठेवलंय हे माहिती नव्हतं. पण क्रुर नियती त्यांच्यावर कोपली. ट्रॅक अंगावर जाण्याचं निमित्त झालं. नियतीनं डाव साधला अन् काळानं झडप घातली. पोटाची आग शमविण्यासाठी त्या बाहेर पडल्या आणि त्यांचा अक्षरश: करुण अंत झाला. या घटनेनं सांगोला तालुका हळहळला. कोणाच्याही बाबतीत असं घडायला नको असंच उपस्थित सगळेच म्हणते होते.**



इंदुबाई इरकर


सुलोचना भोसले


श्रीमाबाई जाधव


कमल बंडगर


मनीषा पंडित


अश्विनी सोनार

▶▶ होत्याचं नव्हतं झालं

▶▶ कटफळ दु:ख सागरात बुडालं

पाण्याची कमतरता असल्याने बरीचशी कुटुंबे अल्पभूधारक व भूमिहीन घरची बिकट परिस्थिती असलेल्या सांगोला तालुक्यातील कटफळ येथील नागरिकांना मजुरी वर अवलंबून राहावे लागते. कामासाठी बाहेरगावी जाणाऱ्या कटफळ येथील मजुरांना सध्या या परिसरात मजुरी उपलब्ध होत आहे. कटफळ येथून रोज सुमारे दहा ते बारा गाड्या भरून मजूर परिसरातील गावांमध्ये जात असतात. कष्टाची कामे करून गुजरान करणाऱ्या कटफळ गावातील सहा महिलांचा अपघातात मृत्यू झाल्याने गाव शोककळेच्या डोहात बुडालं.

या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या इंदुबाई बाबा इरकर यांच्या पतींचे निधन झाले आहे. अल्पभूधारक व सिंचनाची सोय नसल्याने या कुटुंबाला मजुरी शिवाय पर्याय नाही. म्हणून इंदुबाई इरकर या नेहमी इतर महिलांसोबत मजुरीसाठी जातात. मजुरी व हंगामी पिके यावरच कुटुंबाची उपजिविका सुरू आहे. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या अश्विनी शंकर सोनार यांची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक आहे.पती गावात टेलर काम करतात. यांना एक मुलगा व एक मुलगी असून दोघांचेही शिक्षण सुरू आहे. कटफळ सारख्या ग्रामीण भागात फारशी शिलाई मिळत नसल्याने कुटुंबाची गुजरान व मुलांचे शिक्षण हे मजुरीतून मिळणाऱ्या पैशावर अवलंबून होते. अपघातामुळे हे कुटुंब उध्वस्त झाले असून मुलांच्या संगोपनाचा व शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. सुलोचना रामा भोसले या कटफळ येथे आपल्या भावाकडे राहत होत्या. मोल- मजुरी करून त्यांची गुजरान सुरू होती.

कमल यल्लाप्पा बंडगर यांच्या पतींचे तीन वर्षांपूर्वीच निधन झाले आहे. अल्पभूधारक असलेल्या भोसले यांच्या कुटुंबाची उपजिविका मोल मजुरीवर चालते. त्यांना तीन मुले असून ती सर्व मुले माती कामासाठी वसई येथे राहतात. कमल बंडगर या कटफळ येथे एकटा राहून मजुरी करत आपले जीवन जगत होत्या. शिरमाबाई लक्ष्मण जाधव या कटफळ येथे आपल्या भावाकडे राहत असत. मजूरी करून त्यांची त्यावर उपजिविका चालत होती.

त्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या मनीषा आदिनाथ पंडित यांच्या पतींचे सुमारे आठ वर्षांपूर्वी याच मार्गावर उंबरगाव जवळ अपघातात निधन झाले होते. उपजीविकेचे कोणतेही साधन नसणाऱ्या मनीषा पंडित मजुरी करून प्रपंच चालवत होत्या. त्यांना दोन मुली व एक मुलगा आहे.

यापैकी एका मुलींचे लग्न झाले असून एका मुलींचे व मुलाचे शिक्षण सुरू आहे. अपघातात मनीषा पंडित यांचे निधन झाल्याने हे कुटुंब पूर्णत: उध्वस्त झाले आहे. घरातील कर्ती स्त्री अपघातात मरण पावल्याने या कुटुंबाचा प्रपंच उघड्यावर आला आहे.

### हुंदका अन् आक्रोश थांबता थांबेना...

सांगोला तालुक्यातील मौजे कटफळ इथल्या मजुरी करणाऱ्या बिचाऱ्या सहाजणींवर काळानं अचानक झडप घातली. यातून होत्याचं नव्हतं झालं. या संबंधित महिला त्यांच्या त्यांच्या कुटुंबाचा आधार होत्या. संसाराचा कणा होता. मात्र अपघाताच्या घटनेत त्यांना त्यांच्या कुटुंबियाचा पर्यायानं जगाचा निरोप घेतला. या संबंधित महिलांच्या घरावर जणू दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या घरचे घडलेल्या घटनेवर धाय मोकलून रडताहेत. त्यांच्या घरातला हुंदका अन् आक्रोश थांबायला तयारी नाही.

### अर्ध्यावरती डाव मोडिला....

कटफळच्या त्या महिला मोलमजूरी करुन आपल्या कुंटुंबाची गुजराण करीत होत्या. हलाखीच्या परिस्थितीत त्यांचा जगण्याचा संघर्ष सुरु होता. याच संघर्षाच्या टप्प्यावर त्यांना आपली जीवनयात्रा कायमची संपवावी लागली. 'भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी, अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहाणी' असाच ह्द पिळवटून टाकणारा प्रकार या अभागी महिलांच्या बाबतीत झाला. क्रुर नियतीच्या मनात जे होतं अगदी तसंच झालं. या महिलांना सगळं अर्ध्यावरच सोडून इहलोकी पोचावं लागलं.